महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२७५६९ / ०२०-२६१२२६५२ ई-मेल: directorsocialwelfare@yahoo.co.in

अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे कालमर्यादा

क्र.सकआ/शिक्षण/डीबीटी पोर्टल/2223 / २०१७-१८
दिनांक : 6.10.२०१७

प्रति,

---

---

---

विषय :- अनुसुचित जातीच्या पात्र लाभार्थ्यांना सामाजिक न्याय विभागा अंतर्गत दिल्या जाणा-या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा विद्यावेतन, निर्वाह भत्ता इ.लाभ त्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात थेट जमा करणेबाबत....

संदर्भ:- १) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र ५५९ /तांशि-४ दि. १५.४.२०१७

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र. ४०३/शिक्षण-१ दि. ७ ऑगस्ट २०१७

महोदय,

कृपया संदर्भ क्र. १ व २ चे शासन निर्णय अवलोकन होण्याची विनंती आहे.

१) महाराष्ट्र आधार अधिनियम २०१६ आणि सामाजिक न्याय विभागाची अधिसुचना दि. २५.५.२०१७ नुसार अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क, निर्वाह भत्ता, विद्यावेतने इ.लाभ हा लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात या वर्षापासून थेट जमा करण्यात येणार आहे.

२) सदर प्रयोजनार्थ माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून "केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण प्रणाली" (State DBT and service portal), https://mahadbt.gov.in हे संकेतस्थळ विकसीत करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना लाभ मिळण्याकरीता अर्ज करणे पासून ते लाभाची रक्कम त्यांच्या बॅंक खात्यात जमा करणे पर्यंतच्या सर्व प्रक्रिया या राज्यस्तरीय डीबीटी पोर्टल मार्फत करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

३) संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांची अनुज्ञेय शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काची प्रतीपुर्ती ही संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / तंत्र निकेतने यांना अदा करणे ऐवजी या लाभाची रक्कम थेट संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीत बॅंक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

Scanned by CamScanner